# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना
# पंचायत समिती तलासरी

**परिचय :-**

| विषय क्र.१ | विभागाची माहीती :- | मगाराग्रारोहयो विभाग |
|---|---|---|
| A | विभागाचे नाव | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना |
| B | विभागाचे कार्य | "मागेल त्याला काम आणि कामाप्रमाणे दाम" |
| C | विभागातील कर्मचारी संवर्ग निहाय माहीती | |
| D | विभाग प्रमुखाचे पदनाम | सहाय्यक कार्यक्रम अधिकारी |
| E | संवर्ग | अनुसुचित जमाती |
| F | विभागाचा दुरध्वनी क्रमांक | ०२५२१-२२०९७४ |
| G | विभागाचा ई-मेल आयडी | mregstalasari१२३@gmail.com |

**मुळ आढावा**

सन २००५ मध्ये केंद्र शासनाने संपूर्ण भारतात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (विद्यमान नाव - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा) लागू केला. तसेच केंद्र शासनाने ज्या राज्यांनी पूर्वीपासून रोजगार हमी अधिनियम मंजूर केला होता, अशा राज्यांना केंद्र शासनाच्या अधिनियमातील कलम २८ अन्वये त्यांचा कायदा राबविण्याची मुभा दिली होती.

तद्नुसार महाराष्ट्र शासनाने सन २००६ मध्ये पुर्वीचा कायदा ठेवण्याचा पर्याय स्विकारला आहे. मात्र, विधानमंडळाने केंद्रिय कायद्यास अनुसरुन राज्यास निधी मिळवण्याच्या अनुषंगाने १९७७ च्या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा केल्या, त्यामुळे योजना राबविण्याच्या कार्यपध्दतीत बदल झाला आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र (MGNREGS) या योजनेंतर्गत केंद्र शासन १०० दिवस प्रति कुटुंब रोजगाराची हमी देते व १०० दिवस प्रति कुटुंब मजुरीच्या खर्चासाठी निधी पुरवते. प्रति कुटुंब १०० दिवसावरील प्रत्येक मजुराच्या, मजुरीच्या खर्चाचा आर्थिक भार राज्य शासन उचलते.

१. पेयजल स्त्रोतांसह भूजलाचे पुनर्भरण करण्यावर विशेष भर देऊन भूमिगत पाट, मातीची धरणे, रोधी धरणे, संरोधी धरणे यांसारखी भूजल स्तर वाढविणारी व त्यात सुधारणा करणारी जल संधारणाची व जल संचयाची बांधकामे;
२. व्यापक पाणलोट क्षेत्र प्रक्रिया करता येईल असे समतल चर, मजगी घालणे, समतल बांध, दगडी संरोधक, दगडमातीचे कक्षबोध (गॅबियन संरचना) आणि पाणलोट विकासाची कामे यांसारखी जलव्यवस्थापनाविषयक कामे;
३. सूक्ष्म व लघू पाटबंधाऱ्याची कामे आणि सिंचन कालवे व नाली बांधणे, त्यांचे नूतनीकरण करणे व परिरक्षण करणे;
४. सिंचन तलाव व इतर जलाशये यांमधील गाळ उपसण्यासह पारंपारिक जलाशयांचे नुतनीकरण करणे;

५. परिच्छेद ४ मध्ये अंतर्भूत असलेल्या कुटुंबांना फलोपयोग घेण्याचा रीतसर हक्क मिळवून देईल असे, सर्व सामान्य व वन जमिनींवरील सडक पट्टया, कालवा बांध, तलाव अग्रतट (टँक फोरशोअर) आणि किनारी पट्टे यावरील वनरोपण, वृक्ष लागवड आणि फलोत्पादन;
६. सामुहिक जमितीवरील भूविकासाची कामे

**योजना आढावा :-**

| महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना | राज्य रोजगार हमी योजना |
|---|---|
| १. केंद्रिय कायदयाच्या परिशिष्ट १ मधील कलम १(iv) प्रमाणे | १. राज्य रोहयो कायदयाच्या कलम ७(२)(x) प्रमाणे |
| २. **योजना** | २. **योजना** |
| अ) मग्रारोहयो विहिरी | अ) जवाहर विहिरी |
| ब) शेततळे (यंत्रसामुग्रीचा वापर न करता) | ब) रोहयो फळबाग लागवड |
| क) फळबाग लागवड | क) रोहयो तुती लागवड |
| ड) भूसुधारणा | ड) खाजगी पडीक जमिनीवर वृक्ष लागवड |
| | ई) शेततळे |
| ३. प्रत्यक्ष कामावर येणारा खर्च शासनाकडून करण्यात येतो. | ३. अनुदान पध्दतीची प्रतिपूर्ती योजना |
| ४. जॉब कार्ड आवश्यक आहे | ४. जॉब कार्ड आवश्यक नाही. |
| ५. ग्रामसभेद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येते व गटविकास अधिकारी प्रशासकीय मान्यता देतात | ५. विविध स्तरावर मान्यता |
| ६. सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीकडून अंमलबजावणी | ६. विविध यंत्रणांकडून अंमलबजावणी |
| ७. यंत्रसामुग्री वापण्यास मुभा नाही. | ७. प्रतिपूर्ती योजना असल्याने<br>यंत्रसामुग्री वापण्यास मुभा आहे. |
| ८. १५ दिवसात मजुरी प्रदान करणे | ८. १५ दिवसात अनुदान देणे बंधनकारक नाही |
| ९. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमीकायदयातील तरतुदीनुसार परिच्छेद २ मधील लाभार्थ्यांची निवड करण्यात येते | ९. राज्यशासनाच्या निकषांप्रमाणे<br>लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. |
| १०. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक | १०. राज्यशासनाने ठरवून दिलेल्या<br>मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक. |

## योजनांची माहीती- वैयक्तिक लाभाच्या योजना

| H | लाभाचे नाव | निकष |
|---|---|---|
| १ | सिंचन विहीर | वार्षिक आराखडयामध्ये नावाचा समावेस असणे |
| २ | गुरांचा गोठा शेड तयार करणे | नमुना अर्ज |
| ३ | कुकुट शेड तयार करणे | जातीच्या प्रवर्गानुसार लाभार्थीची निवड |
| ४ | शेळीपालन शेड तयार करणे | ग्रामपंचायत ठराव |
| ५ | शेततळी | सात बारा उतारा/जागेचा दाखला/८-अ |
| ६ | शोषखडडा तयार करणे | उत्पन्नाचा दाखला |
| ७ | पुनर्भरण खडडा | जातीचा दाखला |
| ८ | वैयक्तिक शौचालय बांधणे | रहीवाशी दाखला |
| ९ | अझोला पुरक पशुखादय देण्याची व्यावस्था | समंती पत्र |
| १० | इंदिरा आवास योजना (अकुशल भाग) | दारीद्र रेषेखालील दाखला |
| ११ | कंपोष्टखडडा तयार करणे | ओळख पत्र (मतदान कार्ड/आधार कार्ड/रेशनकार्ड) |
| १२ | वृक्षलागवड | जॉबकार्ड सत्यप्रत |
| १३ | | ग्रामपंचायत शिफारस दाखला |
| १४ | | हमीपत्र |

## सार्वजनिक लाभाच्या योजना :-

| | | |
|---|---|---|
| | कामाचे नाव | वार्षिक आराखडयामध्ये नावाचा समावेस असणे |
| | माती भराव रस्ता तयार करणे | ग्रामपंचायत ठराव |
| | शाळा मैदान सपाटीकरण | ग्रामपंचायत सहमती पत्र |
| | पक्या बंधाऱ्यातील गाळ काढणे | जागेची सहमती |
| | तलावातील गाळ काढणे | ग्रामपंचायत शिफारस दाखला |
| | नालासरळीकरण करणे | जागेची सहमती |
| | सदर योजनेचे सर्व शासन परिपत्रक/निर्णय खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहेत | https://mahaegs.maharashtra.gov.in/ |

## अभिसरण अंतर्गत २८ कलमी कामे

| अभिसरण अंतर्गत घ्यावयाची कामे | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कामांचा प्रकार** | **कार्यान्वयीन यंत्रणा** |
| 1 | शाळेसाठी /खेळाडूच्या मैदानासाठी सरंक्षक भिंत बांधकाम करणे | ग्रामपंचायत |
| 2 | छतासह बाजार ओटा | ग्रामपंचायत |
| 3 | शालेय स्वयंपाकगृह निवारा | ग्रामपंचायत |
| 4 | नाला-मोरी बांधकाम | ग्रामपंचायत |
| 5 | सार्वजनिक जागेवरील गोदाम | ग्रामपंचायत |
| 6 | सिंमेट रस्ता | ग्रामपंचायत |
| 7 | पेव्हिंग ब्लॉक रस्ता | ग्रामपंचायत |
| 8 | डाबर रस्ता | ग्रामपंचायत |
| 9 | शाळे करीता/खेळाच्या मैदानाकरीता साखळी कुंपण | ग्रामपंचायत |
| 10 | अंगणवाडी बांधकाम | ग्रामपंचायत |
| 11 | ग्रामपंचायत भवन | ग्रामपंचायत |
| 12 | सामुहीक मत्स्यतळे | ग्रामपंचायत |
| 13 | सार्वजनिक जागेवरील शेततळे | ग्रामपंचायत |
| 14 | काँक्रीट नाला बांधकाम | ग्रामपंचायत |
| 15 | आर.सी.सी. मुख्य निचरा प्रणाली | ग्रामपंचायत |
| 16 | भुमिगत बंधारा (१० मी*1*१.२०मी*४.५मी*) | ग्रामपंचायत |
| 17 | भुमिगत बंधारा (१५ मी*१.२०मी*४.५मी*) | ग्रामपंचायत |
| 18 | भुमिगत बंधारा (२० मी*१.२०मी*४.५मी*) | ग्रामपंचायत |
| 19 | सिमेंट नाला बंध १० मी लांब व १.०मी उंच | ग्रामपंचायत |
| 20 | सिमेंट नाला बंध १० मी लांब व १.०मी उंच | ग्रामपंचायत |
| 21 | सिमेंट नाला बंध १२ मी लांब व १.२०मी उंच | ग्रामपंचायत |
| 22 | सिमेंट नाला बंध १२ मी लांब व १.२०मी उंच | ग्रामपंचायत |
| 23 | सिमेंट नाला बांध आंध १५ मी लांब व १.२० मी उंच | ग्रामपंचायत |
| 24 | सिमेंट नाला बांध आंध १५ मी लांब व १.२० मी उंच | ग्रामपंचायत |
| 25 | कॉम्पोझिट गॉबियन बंधारा | ग्रामपंचायत |
| 26 | बचत गटांच्या जनावरांसाठी सामुहिक गोठे | ग्रामपंचायत |
| 27 | स्मरशानभूमी शेड बांधकाम | ग्रामपंचायत |
| 28 | नाडेप कंपोस्ट | ग्रामपंचायत |

| क्रमांक | शीर्षक | दिनांक | डाउनलोड |
|---|---|---|---|

# कामांचे फोटो

## माती भराव रस्ता :- ग्रा.प. झरी





**बंधाऱ्यातील गाळ काढणे :- ग्रा.पं. सावरोली-अणवीर**



**नाळा सरळीकरण करणे :- ग्रा.पं. सुत्रकार**




**संरक्षण भिंत :- आमगाव-अच्छाड**

**शोषखडडा :- काजळी**



**शाळा मैदान सपाटीकरण :- ग्रा.प - घिमाणिया**





गुरांचा गोठा शेड ;- काजळी




शेळी शेड- कोचाई-बोरमाळ



कुक्कुटपालन शेड - कोचाई-बोरमाळ



सिंचन विहीर :- कोचाई-बोरमाळ




सिंचन विहीर :- उपलाट



विशेष कार्यक्रम /चालु घडामोडी :-

| अ.क्र | माहीती | दिनांक | फोटो | पी.डी.एफ | विडीओ |
|---|---|---|---|---|---|
| १ | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०२२-२३ चे लेबर बजेट मी समृदध तर गाव समृदध ,गाव समृदध तर मी समृदध ,पर्यायाने माझा महाराष्ट्र समृदध हया धोरणा अंतर्गत लखपती कुटुंब या संकल्पनेवर आधारीत असुन सन २०२२-२३ चे लेबर बजेटचे रुपांतर समृदधी बजेट मध्ये करण्यात येत आहे.या बाबत तालुक्यातील सर्व अधिकारी /पदाधिकारी/कर्मचारी याचे ऑनलाईन प्रशिक्षण घेण्यात आले आहे. | दि.२४/०७/२०२१ ते दि.२७/०७/२०२१ | ऑनलाईन प्रशिक्षण | | |

यशोगाथा –
ग्रामपंचायत उपलाट




**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र –**

ग्रामपंचायत उपलाट

ता.तलासरी जि.पालघर

# यशोगाथा

# सिंचन विहीर

लाभार्थीचे नाव श्री :योगेश अमृत वरखंडे

पत्ता-उपलाट शनवारपाडा ता.तलासरी जि.पालघर

योजनेचे नाव – महात्मा गांधी राष्टीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र

लाभाचे नाव -सिंचन विहीर

| | |
|---|---|
| तांत्रिक मान्यता | :1802005/2023-24/79214/TS/12/02/2024 |
| प्रशासकीय मान्यता | :1802005/2023-24/79214/AS/12/03/2024 |
| कामाचा संकेतांक | :1802005004/IF/1235944846 |
| काम चालू झाल्याचा दिनांक | :10/04/2024 |
| काम पूर्ण झाल्याची दिनांक | : |
| अंदाजपत्रकीय रक्कम | : 400000 |
| मनुष्य दिवस निर्मिती | :552 |

## प्रत्यक्ष खर्च

| | |
|---|---|
| **अकुशल खर्च** | **:१६७११८** |
| **कुशल खर्च निरंक** | **: १८९५९४** |
| **एकूण खर्च** | **:३५६७१२** |
| **मनुष्य दिवस निर्मिती** | **: ५५२** |
| **मोजमाप पुस्तिका नंबर** | **: १४८२१** |
| **ई मस्टर नं** | **:२२५,२२६,५८५,८९७,८९८,१२०२,१२०३,** |


OPPO A74 5G

## लाभार्थींचे मनोगत :

मी श्री.योगेश अमृत वरखडे रा.उपलाट शनवारपाडा ता.तलासरी जि.पालघर येथील रहिवासी  असून मला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०२३-२४ मध्येसिंचन विहीर मंजूर झाली  या पुर्वी माझे कुटुबं खुपच हालाखीचे जिवन जगत होते. त्याचप्रमाणे माझे कुटुंब उदनिर्वाहासाठी सतत स्थलांतर करावे लागत होते.तसेच पिण्याच्या पाण्यासाठी आम्हाला अर्धा किलोमीटर पर्यत जावे लागायचे. हा डोगराळ असल्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी खूप त्रास सहन करावा लागायचे. परंतु मला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहीरीचे लाभ मिळाल्याने मला माझ्या आयुष्यात कलाटणी देणारे ठरले. या लाभामुळे मी माझ्या स्वत:च्या शेतामध्ये बारमाही पिके घेण्यास सुरवात केली आहे. मी सिंचन विहीर काम पूर्ण केल्यानंतर महाराष्ट्र विदयुत वितरण कडून मला लाईटसाठी पोल  जाण्या-येण्यासाठी  रस्त्याचे आवश्यकता येत आहे. त्याबददल मी ग्रामपंचायतीला अर्ज देणारआहे.

या कामाबाबत ग्रामपंचायत उपलाट ग्रामविकास  अधिकारी श्री .कल्पेश अधिकारी सर यांचे उत्त्म मार्गदशन व सहकार्य मिळाले तसेच रोजगार सेवक श्री.किरण पाटकर यांनी चांगले सहयोग दिले यांचे मी धन्यवाद मानतो. व मी सिंचन विहीरीचे काम पूर्ण झाल्यानंतर फळबाग लागवड, फुलशेती तसेच वर्षभरात येणारे सीजन प्रमाणे गवार,वांगीमिरची इत्यादी भाज्या उत्पादन घेतो. आज मलासिंचनविहीरीच्या लाभामुळे खूपच आर्थिक फायदा झालेला आहे.

## प्रशासकीय सहयोग:

शासनाच्या महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन विहिरीचे लाभ हा मला पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत कार्यालयाकडून पूर्ण सहयोग देण्यातआलेला आहेमला माझ्या सिंचन विहिरीवर काम  . पूर्ण करून दिले त्याच्याबद्दल  या मजुरांची मजुरी निर्माण करून दिलेत त्यामुळे माझ्या सिंचन विहीर-करणा .आभारी आहे